अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काल

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# आरटीओलाच टाळे ठोकण्याचा लवकरच निर्णय

ज्या गोष्टी कालबाह्य झाल्या असतील त्या रद्दबातल करणे आणि ज्या यंत्रणा किंवा व्यवस्थांमुळे भ्रष्टाचार वाढतो, त्यात अमूल्य सुधारणा म्हणजे विकासाच्या दिशेने वाटचाल होऊ शकते. केंद्रात नवे सरकार आल्यापासून काही बदल करण्याला सरकारने प्राधान्य दिलेले दिसते. त्यातला पहिला मोठा आणि धोरणात्मक निर्णय म्हणजे नियोजन आयोगाचे विसर्जन करण्याची घोषणा आणि आता त्याच्या पाठोपाठ केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी संपूर्ण देशात भ्रष्टाचाराचे मनसोक्त कारण ठरलेली आर.टी.ओ. म्हणजेच वाहतूक पोलीस नावाची व्यवस्थाच रद्द करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. आरटीओकडून वाहनचालकांना त्रास देण्याचा प्रकार जास्त होतो. पैसे खाण्यासाठी वाहनचालक हा खात्रीचा मार्ग ठरला. कोणत्याही छोट्या मोठ्या कारणासाठी वाहनचालकाला दंडाची भीती दाखवली जाते. अन्यथा, त्याच्या मोबदल्यात पैशाची मागणी केली जाते. पोलीस विभागांतर्गत येणारी ही रस्ते वाहतूक शाखा सगळ्या देशातच भ्रष्टाचाराचे आगर ठरली आहे. रोज लाखो वाहनांची ये-जा होते. त्यातील २५ टक्के वाहनचालकांकडून काहीना काही कारणे सांगून पैसे उकळले जातात. वाहतूक पोलिसांच्या या जाचातून देशातील कोट्यवधी वाहनचालकांची सुटका होणार असेल तर देशातील तमाम जनता नितीन गडकरींना धन्यवाद देतील, यात काही शंका नाही. या आरटीओच्या जागी नवी पर्यायी यंत्रणा आणण्याची योजना इंग्लड किंवा अन्य प्रगत देशात जशी वाहतूक पोलिसांची व्यवस्था आहे, तशी भारतात आणण्याचा प्रयत्न असल्याचे गडकरींनी म्हटले आहे. त्यांनी हा बदल जरूर करावा. भ्रष्टाचाराची ही पदसिध्द व्यवस्था बदलणे ही आजच्या काळाची गरज आहे. पदसिध्द असे म्हणण्याचे कारण एकच की सध्याच्या वाहतूक पोलीस व्यवस्थेला असे वाटते की, आपल्याला कोणीही हात लावणार नाही. वाहतूक कायद्यातील थोडेफार बदल होत राहतील. परंतु आपली कमाई कोणीही रोखू शकणार नाही. कदाचित त्यांना एवढा आत्मविश्वास वाटण्याचे कारण असेही असेल की, या व्यवस्थेतही पैसे खाण्याची साखळी साध्या पोलिसापासून थेट मंत्र्यांपर्यंत मजबूत आहे. प्रत्येकाचा भाग त्यात ठरलेला असल्याने भ्रष्टाचाराच्या महामार्गावर कोणीच स्पीडब्रेकर लावू शकत नाही. तसा प्रयत्न झाला तर करणाऱ्याच्या कमाईवर परिणाम होईल अशी या विभागाची खात्री असल्याने त्याला आम्ही भ्रष्टाचाराची पदसिध्द व्यवस्था असे म्हटले आहे. नितीन गडकरी पुढाकार घेऊन नवा भ्रष्टाचार, गैरव्यवहार नसलेली नवी व्यवस्था आणणार असतील तर तिचे स्वागत आहे. मात्र ती व्यवस्था अधिकाधिक निर्दोष असावी. कारण वाहतूक विभाग हे एक असे क्षेत्र आहे, की जिथे कोणतीही नवी व्यवस्था आली तरी भ्रष्टाचार होण्याचीच शक्यता जास्त आहे.

## भ्रष्टाचाराचा नवा अवतार नको

यासाठीच विकास किंवा प्रगतीचे मापदंडसुध्दा या काळाबरोबर बदलत राहतात. वाहतूक पोलीस व्यवस्थेत लक्ष्मी दर्शन प्रकार जास्त असतो. या क्षेत्रातला तो कोडवर्ड आहे. लक्ष्मी दर्शनाशिवाय एकाही पोलीस अधिकाऱ्याचा दिवस सुरू होत नसावा. लोकांनादेखील आर.टी.ओ. विभाग म्हटल्यावर पैसे देण्याशिवाय पर्याय नाही अशी सवय झाली आहे. अनेकवेळा तर सर्व कागदपत्रे असतात तरी वाहतूक पोलिसांना चुका काढायला कोणतेही कारण पुरते आणि नियम पाळत नाही म्हणून दंडाची पावती फाडण्याची धमकी दिली जाते. सिग्नल तोडल्याप्रकरणी रोज शेकडो वाहनचालक या वाहतूक पोलिसांच्या तावडीत सापडतात. त्यातल्या ७५ टक्के लोकांना पावती न देता पैसे घेऊन सोडले जाते. पोलिसांना सहजपणे भ्रष्टाचाराचे इंधन पुरविणारी ही व्यवस्था संपुष्टात आली पाहिजे. त्या जागी नवी आणखीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर असलेली पोलिसांचा कमीतकमी हस्तक्षेप असलेली व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. गडकरी यांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, जर वाहतुकीचे नियम एखाद्याने मोडले असतील तर पुढच्या काही तासात त्याच्या घरी दंडाची नोटीस पाठविली जाईल आणि तो दंड तिप्पट असेल याचा अर्थ मुळातच लोकांनी नियम पाळावे, असा आग्रह केला जाईल. नवीन तंत्रज्ञान वापरून वाहतूक व्यवस्थेत शिस्त आणण्याचा हा चांगला प्रयत्न ठरू शकतो. मात्र इथेसुध्दा घरी नोटीस जाण्यापूर्वी पोलीसच संबंधित माणसाच्या घरी पोहोचतील आणि मांडवली करून पोलीस पैसे खाण्याचा उद्योग चालूच ठेवू शकतात. म्हणूनच नवी व्यवस्था आणताना भ्रष्टाचाराचा नवा अवतार येणार नाही याची त्यांनी काळजी घ्यावी, कारण आज हा भ्रष्टाचार सगळीकडे इतका फोफावला आहे की तो रोखायचा कसा, असा प्रश्न पडतो. राजकीय क्षेत्रात तर या भ्रष्टाचाराचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. तोदेखील कमी करण्याचा गडकरी आणि त्यांच्या सरकारने प्रयत्न केला पाहिजे.

## सामान्य माणसाला दिलासा

केंद्रामध्ये नवे सरकार आले तेव्हापासूनच लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. काहीतरी नवीन घडले पाहिजे.आतापर्यंत सतत दुर्लक्ष झालेल्या सामान्य माणसाला छोट्या छोट्या गोष्टींमधून दिलासा हवा आहे. वर्षानुवर्षे अनावश्यक ठरलेल्या योजना बंद करून थेट लोकांना कायदा पोहचवणाऱ्या योजनांची लोक आतुरतेने वाट पहात आहेत. त्यातला एक भाग म्हणून या आरटीओला रेड सिग्नल दाखवण्याची सरकारने सुरू केलेली तयारी विकासाच्याच दृष्टीने एक महत्वाचा टप्पा ठरू शकते. आतापर्यंत देशामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेल्या या वाहतूक पोलीस यंत्रणेमध्ये अमूलाग्र सुधारणा करावी असे कोणालाही वाटले नाही. फक्त वेळोवेळी मोटारवाहन नियमांमध्ये बदल केले गेले. आणि या खात्यात चालणाऱ्या खाबूगिरीला प्रोत्साहनच दिले गेले. एका सर्व्हेक्षणामध्ये चंदीगढमधले वाहतूक पोलीस सर्वाधिक भ्रष्टाचार करतात असे आढळून आले होते. त्या खालोखाल बिहार, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राचा नंबर लागतो. नव्या सरकारची ही भ्रष्टाचार विरोधातली नवी आघाडी निश्चितच सामान्य माणसाला उपयुक्त ठरेल.